# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०२/२०१८

**१) विवाहितेचा हुंन्डयासाठी शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक माहे ऑगस्ट २०१७ ते आज पावेतो यातील फिर्यादी हीस यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे वडीलांनी लग्नात सोन्याचा गोफ व नगदी पैसे दिले नाही, असे बोलुन हुंडयाची मागणी करून भांडण, मारपीट करून शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व महिला समुपदेशक केन्द्र भंडारा यांचे कागद पत्राावरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४९८(अ),३४ भादंवि. सहकलम ३,४ हुंडा प्रती.अ.कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २९/०१/२०१८ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी ही शाळेत एसटी बस ने आपले मैत्रीनी सह बस मध्ये बसुन आंधळगाव येथे शाळेत जात असतांनी आरोपी हा तिचे जवळ बसुन तिचे वियभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३५४(अ),(१) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. इंगळे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) संगनमत करून रस्त्याचे वादावरून काठीने मारून फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २६/१२/२०१८ चे १७.०० वाजता. दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी सोबत घराचे रस्त्याचे वादावरून भांडण करून थापड –बुक्यांनी व काठीने मारहान केल्याने फिर्यादीचे डाव्या पायाचा अंगठा फॅक्चर झाल्याने, डॉ. रिपोर्ट व फिर्यादी दिनेश कुशाल हेमने वय ३६ वर्ष रा. कोल्हारी याचे बयाणा वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**४) भांडण करून काठीच्या झिलपीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक ३१/१२/२०१८ चे २०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीने आरोपीची मोटार सायकल रोडावरून बाजुला केल्याचे कारणा वरून काठीच्या झिलपीने फिर्यादीचे डोक्यावर, खांदयावर मारून दुखाप:त केल्याने, फिर्यादी बळीराम बाळा बारस्कर वय ३६ वर्ष रा. भुगाव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :-**

दिनांक ३१/१/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी व राजु अंताराम भोयर वय ३२ वर्ष रा. गडेगाव हे हिरो होन्डा मोटार सायकल क्र. एमएच ३६ वाय ३०४६ मध्ये पेट्रोल भरून गावी परत जात असतांनी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला मागेहुन धडक मारल्याने, राजु भोयर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी धनपाल दिलीप वंजारी वय २९ वर्ष रा. गडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादवी.सहकलम १८४,मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) निष्काळजीपणे ट्रक चालवुन म्हैशला धडक मारून मरणास कारणीभुत होवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/०२/२०१८ चे ०९.३० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन २ म्हैश ला धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व ४ म्हैस गंभिर जखमी व ६ म्हैस किरकोड जखमी करून २,४५००० /रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी पतीराम साधु लांजेवार वय ४५ वर्ष रा. राजापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,४२९ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कुरूडकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**७) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी. :–**

दिनांक २८/०१/२०१८ चे १२.०० वाजता. दरम्यान यातील जखमी हा त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ वाय ६२०१ ने एनएच ६ रोडने जात असता, समोरून येणा–या यातील आरोपी मोटार सायकल ही हयगयीने , निष्काळजीपने चालवुन आमोरा समोर धडक दिल्याने मोटार सायकल वरील आशिष भाऊराव सार्वे वय ३५ वर्ष व पत्नी सौ. मनिषा वय ३३ वर्ष व मुलगा सोहम वय ५ वर्ष यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवाला वरून घटणास्थळ पो.स्टे भंडारा येथील असल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. गिरडकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) हयगयीने वाहन चालवुन टवेरा गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंदः–**

दिनांक ०१/०२/२०१८ चे १५.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी देवानंद भगवान कडुकार वय २५ वर्ष रा. आमगाव दिघोरी हा आपले ताब्यातील टवेरा गाडी क्र. एमच २१ एन ०१०१ ही घेवुन कारधा कडुन भंडारा कडे येत असतांना, नागपुर कडुन रायपुर कडे जाणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, चालवुन समोरून येणा–या २ गांडयाना ओव्हरटेक करून फिर्यादीचे टवेरा गाडीला समोरून धडक मारल्याने टवेरा गाडीचे नुकसान झाल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०१/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, लाखनी व पालांदुर येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५१ लिटर ३०० मिलीलीटर हातभंट्टी दारू किंमती ३,१३५/–रु, १ लिटर ८०० मिलीलीटर देशी दारू ,किमती ६००/रु. तसेच जुगारातुन १३७०/रु. असा एकुन कि.५,१०५/रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०२/२०१८

**१) हयगयीने वाहन चालवुन गाडीचे सामानाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०१/०२/२०१८ चे १५.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे चारचाकी वाहन क्र. सीजी ०७ एमबी २३२१ ने नागपुर कडुन रायपुर कडे जात असतांना समोरून येणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजी पणे चालवुन समोरून येणा–या गांडयाना ओव्हरटेक करून फिर्यादीचे गाडीला समोरून धडक मारल्याने, गाडीचे सामानाचे नुकसान झाल्याने, फिर्यादी श्रीकांत बाबुराव काळे वय ४३ वर्ष रा. कुरूद रोड कोहका भिलाई (छ.ग.) यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०१/०२/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो ही एनएच ०६ रोड बसस्थानक चौक लाखनी येथील येणारे जाणारे लोकांना अडथडा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. टेंभुर्णे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. हेमणे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/०२/२०१८ चे १२.४५ वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल ही जिल्हा परीषद चौक गणेशपुर भंडारा येथे दारु पिवुन दारुचे नशेत मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. फंदे वानिशा. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ३१/०१/२०१८ चे २३.३० ते ०१/२/२०१८ चे ०७.३० वाजता. दरम्यान यातील मृतक बुंदललाल हमीलाल करवेती वय ५१ वर्ष रा. धुटेरा हा फिर्यादीचा वडील असुन एकत्र सोबत राहत होते, यातील मृतक याने कॅन्सरचे आजाराला कंटाळुन गावाबाहेर जावुन स्वत: माहारूकाचे झाडाला गळफास लावुन मरण पावल्याने, फिर्यादी हेमंत बुंदललाल करवेती वय २१ वर्ष रा. धुटेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.